# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक:०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :– "उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत..."**
**संदर्भ :– मा. सहसंचालक, उच्च शिक्षण , पुणे विभाग यांचे संदर्भ जा.क्र. महाडीबीटी–२०२४–२५ /मुलींनामोफतशिक्षण/शिष्यवृत्ती शाखा/६५०७, दि. २३/०७/२०२४.**

या परिपत्रकाद्वारे सर्व मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, वरील संदर्भीय पत्रान्वये मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांनी संदर्भीय पत्रानुसार मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अमंलबजावणीबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था मधील प्राचार्य/संचालक व स्कॉलरशिप नोडल ऑफिसर (Scholarship Nodal officer) यांच्या करिता मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांनी जिल्हानिहाय ऑनलाईन मिटींग आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर मिटींगची लिंक, दिनांक व वेळ सोबतच्या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेली असून उक्त परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे आपणांस विनंती करण्यात येते की, सदर सभेस उपरोक्त लिंकद्वारे नमूद केलेल्या वेळेत उपस्थितीत रहावे.

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/२२६३
दिनांक : २३/०७/२०२४

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

सोबत:– वरिलप्रमाणे.

प्रत:
मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/मुलींनामोफतशिक्षण/शिष्यवृत्ती शाखा/६५०७ दिनांक : २३.०७.२०२४

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ : -
१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ३३२/ तांशि-४ दि. ०७.१०.२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ. २०२४/ प्र.क्र. १०५/ तांशि-४ दि. ०८.०७.२०२४.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिस/शिष्य- २०२४-२५/मुमोशि/३८५३ दि. १९.०७.२०२४.
४. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचे परिपत्रक क्र. महाडीबीटी-२०२४-२५/मुलींनामोफतशिक्षण/शिष्यवृत्ती शाखा/६३७६ दि. २३.०७.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधित शासन निर्णय क्र. २ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process- CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे. याबाबत या कार्यालयाकडून संदर्भ क्र. ४ च्या परिपत्रकाद्वारे उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण या योजनेची अंमलबजावणी करणेकरीता महाविद्यालयांना अगोदरच सविस्तरपणे निर्देश देण्यात आले आहेत.

**तरी मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ मधील प्राचार्य आणि स्कॉलरशिप नोडल ऑफिसर ( Scholarship Nodal Officer ) यांच्याकरिता मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांचेमार्फत जिल्हानिहाय ऑनलाईन मिटींग आयोजित करण्यात येत आहे. सदर मिटींगची लिंक, दिनांक आणि वेळ खाली नमूद करण्यात येत आहे.**

| अनु.क्र. | जिल्हानिहाय महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ | दिनांक | वेळ | लिंक |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे शहर | २४.०७.२०२४ | सकाळी १०.०० वाजता | https://meet.google.com/mkk-xhau-ipa |
| २. | पुणे ग्रामीण | २४.०७.२०२४ | सकाळी १०.३० वाजता | https://meet.google.com/amw-onpj-dzp |
| ३. | अहमदनगर जिल्हा | २४.०७.२०२४ | सकाळी ११.०० वाजता | https://meet.google.com/cpn-oyyr-iij |
| ४. | नाशिक जिल्हा | २४.०७.२०२४ | सकाळी ११.३० वाजता | https://meet.google.com/dax-zcgy-apy |

**सर्व जिल्हानिहाय महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ यांनी उपरोक्त नमूद लिंकद्वारे नमूद केलेल्या वेळीच उपस्थित रहावे.**

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १६ यांना माहितीस्तव सविनय सादर.